MHJG210000722022

| | | |
|---|---|---|
| संचिका दाखल दिनांक | : | ०७/०१/२०२२ |
| संचिका नोंदणी दिनांक | : | ११/०१/२०२२ |
| संचिका निकाली दिनांक | : | ०२/०५/२०२६ |
| कालावधी | : | **०४व.०३म.२६दि.** |

**नमुना क्र.३२**
**भाग 'अ'**
**[फौजदारी कार्यपुस्तीका प्रकरण ६ परिच्छेद क्र. ४४(i)]**

<table>
<tr><td colspan="3">

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२) यावल</u>**<br>**<u>जि. जळगांव यांचे न्यायालयात</u>**<br>(पिठासीन अधिकारी गणेश रा. कोलते)<br>न्यायनिर्णय घोषित दि. ०२/०५/२०२६<br>**(नियमित फौजदारी खटला क्र. ३/२०२२)**<br>**निशाणी क्रमांक १००/ब**

</td></tr>
<tr><td colspan="3">गुन्हा नोंद क्र. १५९/२०२१, फैजपूर पोलीस स्टेशन, जि. जळगांव.</td></tr>
<tr><td>फिर्यादी / तक्रारदार</td><td></td><td>महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>फैजपूर पोलीस स्टेशन, यावल.</td></tr>
<tr><td>अभियोगपक्षातर्फे</td><td></td><td>सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.बी.ए.अहिरराव</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td></td><td>१. किरण प्रभाकर केदारे,<br>वय – ३७ वर्षे, व्यवसाय– नोकरी,<br>२. कल्पना प्रभाकर केदारे<br>वय – ५८ वर्षे, व्यवसाय– घरकाम,<br>आरोपी क्र. १ व २ रा. टि.व्ही.रिले केंद्र, प्लॉट नं. २१, नानकवाडा, बलसाड (गुजरात)<br>३. धिरज सुरजलाल सरजारे,(मयत)<br>४.सौ. रेखा धिरज सरजारे<br>वय – ४५ वर्षे, व्यवसाय– नोकरी,<br>आरोपी क्र. ४ रा. साई पार्क सोसायटी, प्लॉट नं.३६/१, वलसाड (गुजरात)</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | **५. योगेश प्रकाश पिंगळे,**<br>वय – ३६ वर्षे, व्यवसाय– खाजगी नोकरी,<br>**६. सौ. कविता योगेश पिंपळे,**<br>वय – ३५ वर्षे, व्यवसाय– घरकाम,<br>आरोपी क्र. ५ व ६ रा. साईदत्ता अपार्टमेंट, फ्लॅट नं.१०३, पटेलवाडा, डहाणू (पुर्व) जिल्हा पालघर<br>**७. मिराबाई डिगंबर बि–हाडे,**<br>वय – ६७ वर्षे, व्यवसाय– घरकाम,<br>आरोपी क्र. ७ रा. द्वारका नगर, भुसावळ, जि.जळगाव |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | ॲड. आर.एफ. मालविया |

## भाग–ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | दि.०३/११/२०१९ ते दि. ०९/११/२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २७/०९/२०२१ |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | :– | ०७/०१/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | १९/०४/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २५/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | :– | ०२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक. आरोपींना निर्दोषमुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समोयोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **किरण प्रभाकर केदारे** | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | **कल्पना प्रभाकर केदारे** | फौ.प्र.सं. कलम ४१–अ ची नोटीस | १८/०५/२०२२ | भा.दं.वि. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३ | **मयत** | | | | | | |
| ४ | **सौ. रेखा धिरज सरजारे** | | | | | | |
| ५ | **योगेश प्रकाश पिंगळे** | | | | | | |
| ६ | **सौ. कविता योगेश पिंपळे** | | | | | | |
| ७ | **मिराबाई डिगंबर बि–हाडे** | | | | | | |

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/ बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार

**अ. अभियोगपक्ष**

| सा.क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | दिपाली किरण केदारे | फिर्यादी | ९७ |
| २. | लताबाई सदानंद मेढे | साक्षीदार | ९८ |

**ब) बचाव साक्षीदार**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क) कोर्ट साक्षीदार**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोग पक्षाचे/ बचाव / न्यायालयाचे निशाणी**

**अ) अभियोग पक्ष**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | निशाणी क्रमांक ०१ | दोषारोप पत्र |

**ब) बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | निशाणी क्रमांक ७३ ते ८० | दोषारोप व निवेदन |

**ड) मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

# न्या य नि र्ण य

**( घोषीत दिनांक ०२/०५/२०२६ )**

आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान (थोडक्यात भा.दं.वि.) कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयासाठीचा खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाच्या खटल्याची संक्षीप्त हकीकत पुढील प्रमाणे.**

**२.** दि.२७/०९/२०२१ रोजी फिर्यादी दिपाली केदारे हिने फैजपूर पोलीस स्टेशन येथे आरोपींविरुध्द फिर्याद दिली. त्यात तिचे असे कथन आहे की, तिचे लग्न समाच्या रितीरिवाजाप्रमाणे दि.०३/११/२०१९ रोजी आरोपी किरण केदारे यांच्याशी भुसावळ येथे झाला. लग्नानंतर ती सासरी नांदण्यासाठी गेली होती. सुरुवातीचे दोन महिने तिला चांगले

नांदवले व त्यानंतर आरोपी तिला त्रास देवू लागले. तिला तिची सासू व तिला स्वयंपाक व्यवस्थीत येत नाही असे बोलून शिवीगाळ करुन त्रास देवू लागली. आरोपी तिला माहेरहून चार चाकी वाहन घेण्यासाठी पाच लाख रुपये घेवून ये नाहीतर ते तिला घरात राहू देणार नाही असे बोलून धमकी देवून तिचा मानसिक व शारिरीक छळ करु लागले. तिने आरोपींना समजवून सांगितले की, ती एवढे पैसे कुठून आणणार तसेच तिची माहेरची परिस्थती चांगली नाही. परंतू आरोपी हे काही ऐकत नव्हते. त्यानंतर तिने फैजपूर पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली. फिर्यादी हिने दिलेल्या फिर्यादीवरुन फैजपूर पोलिस स्टेशन येथे गु.रं.नं.१५९/२०२१ भा.दं.वि. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

३. सदर गुन्ह्याचा तपास रविंद्र मोरे, पो.हे.कॉ, फैजपूर पोलिस स्टेशन यांनी केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरूध्द सबळ पुरावे आढळल्यानंतर त्यांच्याविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि.कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे निशाणी क्र.७३ वर दोषारोप निश्चित केले. ते त्यांना वाचुन दाखविण्यात आले. आरोपींनी गुन्हा केल्याचे नाकारल्याने सदरचा खटला पुढे चालवण्यात आला. आरोपी क्र. ३ हा खटला चालू असतांना मयत झाला. त्यानुसार निशाणी क्र. १ वर आदेश पारित करुन त्याच्याविरुद्ध खटला अबेट करण्यात आला. अभियोग पक्षातर्फे एकुण दोन साक्षीदार तपासण्यात आले. आरोपींविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वयेचा जबाब वगळण्यात आला.

५. अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर आलेल्या पुराव्याच्या आधारे सदर खटल्याच्या निकालासाठी माझे विचारार्थ खालील मुद्ये उपस्थित होतात. सदर मुद्दयावर मी माझा निष्कर्ष खालीलप्रमाणे सकारण नोंदवित आहे.

| अ.क्रं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, दि.०३/११/२०१९ रोजीच्या | |

दोन महिन्यानंतर ते दि.०९/११/२०२० पावेतो आरोपींनी संगनमताने समान उद्देशाच्या पुर्तीकरीता फिर्यादीस नवीन कार घेण्यासाठी माहेरहून पाच लाख रुपये आणावे अशी मागणी केली व तिने ते आणले नाही म्हणुन तिचा शारीरिक व मानसिक छळ करुन भा.दं.वि. कलम ४९८(अ), सह ३४ प्रमाणे गुन्हा केला? .. **नाही**

२. अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी हिला इच्छापूर्वक दूखापत केली त्याव्दारे भा.दं.वि.कलम ३२३ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला? .. **नाही**

३. अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादीचा अपमान करण्याच्या उददेशाने हेतुपुर्वक सार्वजनिक शांततेचा भंग केला त्याव्दारे भा.दं.वि. कलम ५०४ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला? .. **नाही**

४. अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी हिला इजा पोहचविण्याच्या उद्येशाने धमकावले व तिच्या मनात भय उत्पन्न केले. त्याव्दारे भा.दं.वि. कलम ५०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला? .. **नाही**

५. अंतिम आदेश कोणता? **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली**

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ साठी :-</u>**

६. आरोपींविरूद्धचे दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाला आरोपींनी संगनमताने मुळ फिर्यादी दिपाली किरण केदारे हिला माहेरुन चार चाकी वाहन घेण्यासाठी रक्कम रुपये ५,००,०००/- रुपयांची मागणी केली व ती पुर्ण न करु शकल्याने तिला शारीरिक व मानसिक त्रास देवुन शिवीगाळ व दमदाटी केली या बाबी सिध्द करणे गरजेचे आहे. त्यासाठी अभियोग पक्षाने एकुण दोन साक्षीदार तपासलेले आहे. साक्षीदार क्र.१ दिपाली किरण केदारे, मुळ फिर्यादी हिला तपासले. तसेच साक्षीदार क्र.२ लताबाई सदानंद मेढे यांना तपासलेले आहे.

७. भारतीय पुरावा कायदयानुसार आरोपींविरुध्दचे आरोप सिध्द करण्याची प्राथमीक जबाबदारी ही अभियोग पक्षाची आहे तसे न झाल्यास आरोपी निर्दोष मुक्त होण्यास क्रमप्राप्त आहे. वरिल कायदयाची परिस्थती विचारात घेवुन अभिलेखावरील सर्व मुद्दे एकमेकांशी

निगडीत असल्याने त्यांची चर्चा एकत्रीतपणे करण्यात येते.

८. भा.द.वी. कलम ४९८–अ अन्वये गुन्हयासाठी पुढिल बाबी सिध्द होणे गरजेचे आहे. १. स्त्रीच्या पतीने व तिच्या नातेवाईकाने स्त्रीला क्रुर वागणुक देणे. २. अशी कुठलीही ऐच्छीक वागणुक ज्यामुळे स्त्री आत्महत्येस प्रवृत्त होते अथवा तीच्या जिवास अवयवास अगर प्रकृतीस गंभीर इजा वा धोका निर्माण होतो. ३. जेव्हा स्त्रीकडे संपत्तीची गैरकायदेशीर मागणी पुर्ण करण्यासाठी तीला त्रास देवुन तिला व तिच्या नातेवाईकांना भाग पाडले जाते. त्याचप्रमाणे मुळ तक्रारदार हिस मारहाण व शिवीगाळ व दमदाटी झाली होती हे सिध्द होणे गरजेचे आहे.

९. साक्षीदार क्र ०१ फिर्यादी दिपाली किरण केदारे हिला निशाणी क्र.९७ नुसार साक्षीदार म्हणून तपासण्यात आले. तिने तिच्या सरतपासात असे कथन केले आहे की, तिचा विवाह आरोपी क्र.१ याचे सोबत झाला व लग्नानंतर ती सर्व आरोपींसोबत गुजरात येथे नांदायला गेली. तिच्यामध्ये व आरोपींमध्ये घरगुती करणावरुन किरकोळ वाद झाले होते. या व्यतिरीक्त काहीही घडले नाही. आरोपींनी तिला माहेरुन नविन कार घेण्यासाठी रक्कम रुपये ५,००,०००/– रुपयांची मागणी केली होती. ती न दिल्यामुळे त्यांनी तिचा छळ केला होता ही बाब तिने स्पष्टपणे नाकारलेली आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा उलट तपास घेण्यात आला परंतु त्यामध्ये आरोपींविरुध्द कोणताही आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्याचप्रमाणे तिचे आरोपींसोबत आपआपसात सदरचे प्रकरण न्यायालयाबाहेर मिटले असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे तिला पुढे खटला चालविणे नाही असे देखील कथन केले आहे.

१०. साक्षीदार क्र.२ लताबाई सदानंद मेढे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, फिर्यादी दिपाली किरण केदारे तिची मुलगी आहे. तिचा विवाह आरोपी क्र.१ याच्याबरोबर झाला होता. त्यानंतर फिर्यादी दिपाली किरण केदारे ही गुजरात येथे आरोपींबरोबर नांदायला गेली. फिर्यादी व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाले होते. आरोपींनी फिर्यादीस माहेरुन नविन कार घेण्यासाठी रक्कम रुपये ५,००,०००/– मागणी केली होती, फिर्यादी व साक्षीदाराने न

दिल्यामुळे त्यांनी तिचा छळ केला होता ही बाब तिने स्पष्टपणे नाकारलेली आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांचा उलट तपास घेण्यात आला परंतु त्यामध्ये आरोपीविरुध्द कोणताही आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. फिर्यादी हीने तिला सदरचा खटला पुढे चालवायचा नाही म्हणुन तिने निशाणी क्र. ९९ वर पुरसीस दिली. म्हणुन निशाणी क्र. १ आदेश पारीत करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**११.** वरील पुराव्यावरुन आरोपी यांनी संगनमताने फिर्यादीला पैशांची मागणी करुन ती पुर्ण होउ न शकल्याने तिचा शारीरिक व मानसिक छळ केला तसेच तिला धमकावले. तसेच तिला मारहाण करून दमदाटी केली याबाबत योग्य तो पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट मुळ फिर्यादी व आरोपी यांच्यामधील कौटूंबिक वाद हा न्यायालयाबाहेर आपसात मिटलेला आहे हेच दिसून येते. फिर्यादी हिने कथन केल्याप्रमाणे आरोपी यांनी तिला पैश्याची मागणी कधी केली हे सांगितलेले नाही. त्यामुळे तिने पैसे न दिल्याने त्यांनी तिचा छळ केला, याबाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही त्यामुळे भा.द.वी कलम ४९८–अ अन्वये आवश्यक असलेले घटक सिध्द झालेले नाही. त्याचप्रमाणे फिर्यादीला आरोपींनी कधी, कुठे व कशी मारहाण केली तसेच तिला आर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली याबाबत तिच्या पुराव्यात काहीही आलेले नाही. त्यामुळे आरोपींनी तिला ईच्छापुर्वक दुखापत केली यास दुजोरा देणारा सबळ पुरावा अभिलेखावर नाही. तसेच तिला शिवीगाळ व दमदाटी केली व आर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली याबाबत देखील सबळ पुरावा अभिलेखावर नसल्याने सदरचे आरोप हे आरोपींविरुध्द संशयापलीकडे सिध्द होत नाहीत. करिता मी मुद्दा क्र.१ ते ४ उत्तर नकारार्थी नोंदवते.

**<u>मुद्दा क्र.५ करिता</u> :**

**१२.** मुददा क्र.१ ते ४ हे नकारार्थी नोंदविल्याने तसेच आरोपी विरुध्दचा आरोप संशया पलीकडे सिध्द होवू शकलेला नाही. त्यामुळे आरोपी हे सदर गुन्हयातुन निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र.५ च्या निष्कषार्थ मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत

करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. **आरोपी क्र.१ किरण प्रभाकर केदारे, आरोपी क्र.२ कल्पना प्रभाकर केदारे, आरोपी क्र.४ सौ. रेखा धिरज सरजारे, आरोपी क्र.५ योगेश प्रकाश पिंगळे, आरोपी क्र.६ सौ. कविता योगेश पिंपळे व आरोपी क्र.७ मिराबाई डिगंबर बि–हाडे** यांना भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे दोषारोपातुन फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७–अ ची पुर्तता करावी. त्यासाठी आरोपींनी प्रत्येकी रु.१५,०००/–चा जामीन कदबा सहा महिनेचे मुदतीसाठी भरुन दयावा.

४. सदर आदेशाची प्रत ही मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडे नियमानुसार पाठवावी.

***खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय जाहिर.***

GANESH RAJESH KOLTE
Digitally signed by GANESH RAJESH KOLTE
Date: 2026.05.02 15:00:39 +0530

**(गणेश रा. कोलते)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२), यावल.

दि.०२/०५/२०२६.

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this PDF file Order/ Judgment are same word to word, as per the original Order/Judgment. | | |
| Name of the Typist | : | B. B. Katole,<br>Jr. Clerk |
| Name of the Court | : | Judicial Magistrate F.C., (Court No.2) Yawal, Dist. Jalgaon. |
| Judgment/order declared on | : | 02.05.2026 |
| Judgment/Order signed on | : | 02.05.2026 |
| Judgment/Order Uploaded on | : | 02.05.2026 |